Bullet daily news

Thursday, 27 July 2017

# तोंडाद्वारे होणाऱ्या कर्करोगाचा जागतिक दिवस

**इंडोको रेमेडीज तर्फे कर्करोगसंबंधी जागरुकता अभियान**




*(Photo by Suresh Dhere)*

*मुंबई, २६जुलै २०१७ :* दि. २७ जुलै हा दिवस, "तोंडाद्वारे होणाऱ्या कर्करोगाचा जागतिक दिवस", म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये याचे प्रसारण खूप झपाट्याने होत आहे. इंडोको रेमेडीज लि. या मुंबई स्थित औषध कंपनीने या कर्करोगाला आळा घालण्यासाठी मोठ्या प्रमाणात जागरूकता अभियानाचे आयोजन केले असून, त्यात देशभरातील नामवंत कर्करोग व दंतरोग तज्ज्ञांचा सहभाग असणार आहे. या संदर्भात इंडोको रेमेडीज च्या वतीने दि. २६ जुलै रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये संपूर्ण देशभरात राबवण्यात येणाऱ्या या अभियानाची सविस्तर माहिती देण्यात आली. याप्रसंगी डॉ.प्रशांत पवार (वरिष्ठ कर्करोग तज्ज्ञ,फोर्टीस हॉस्पिटल,मुंबई) यांनी प्रतिबंधात्मक उपायांद्वारे तो बऱ्याच प्रमाणात कसा रोखला जाऊ शकतो याचे महत्व विशद केले.

आज भारतामध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणात होत आहे. दरवर्षी कर्करोगाचे सुमारे एक लाख नवीन रुग्ण आढळत असून त्यापैकी सुमारे पन्नास हजार रुग्ण या कर्करोगामुळे मृत्युमुखी पडत आहेत. तंबाखू, सुपारी व मद्य हे घटक प्रामुख्याने या कर्करोगाला कारणीभूत आहेत. तथापि, यावर आळा घातल्यास मृत्यूचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात घटू शकते.
सर्वसाधारपणे तोंडाद्वारे होणाऱ्या कर्करोगाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. सुमारे ८०% रुग्णांमध्ये या कर्करोगाचे निदान खूप उशीरा होत असल्याने त्याचे उपचार अतिशय क्लिष्ट असतात व त्यामुळेच भारतामध्ये कर्करोगामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या रुग्णांमध्ये तोंडाद्वारे होणाऱ्या कर्करोगाची गणना प्रथम क्रमांकाने होते.

तोंडामध्ये लवकर भरून न येणारी छोटी जखम किंवा छोटी गाठ हि याची सुरुवातीची लक्षणे आहेत. यामध्ये ओठ, जिभ, गाल, टाळू, श्वसननलिका आणि घसा यांना कर्करोगाची लागण होऊ शकते व वेळेत निदान व उपचार न झाल्यास तो घातक ठरू शकतो. तोंडाद्वारे होणाऱ्या कर्करोगाचे निदान लवकर झाल्यास त्याचे उच्चारण बऱ्याच प्रमाणात शक्य होते असे डॉ. प्रशांत पवार यांनी स्पष्ट केले.
या रोगाचे सुरुवातीला निदान होणे खूप गरजेचे असल्याने इंडोको रेमेडीज या औषध कंपनीने संपूर्ण भारतभर खास अभियानाचे आयोजन केले असून देशभरातल्या अनेक निष्णात वैद्यकीय चिकित्सकांचा यात सक्रिय सहभाग असणार आहे. हे चिकित्सक पुढे अनेक शिबिरांच्या माध्यमातून या कर्करोगाची लक्षणे कशी ओळखायची याची माहिती देऊन रुग्णांचे समुपदेशन करतील. यासाठी इंडोकोने काही विभागांची निवड केली असून या रोगाने जास्त संख्येने ग्रस्त असणाऱ्या शहरांचा प्रामुख्याने समावेश आहे. रुग्णांसाठी खास प्रशिक्षण देखील देण्यात येणार असून त्याची माहिती विविध माध्यमातून जास्तीतजास्त गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्याचा इंडोकोचा प्रयत्न असणार आहे.

"इंडोको, रुग्णांच्या वैद्यकीय जागरूकतेसाठी कटिबद्ध असून, तोंडाद्वारे होणाऱ्या कर्करोगाचा बिमोड कसा करता येईल याचा प्रसार विविध सामाजिक माध्यमांच्या मदतीने करण्याचा प्रयत्न करत आहे", असे प्रतिपादन इंडोकोच्या व्यवस्थापकीय संचालिका अदिती कारे पाणंदीकर यांनी केले.

INDOCO REMEDIES LTD.